भरतीद्वारे भरावयाची पदे [illegible]
या आरक्षित पदांची मागासवर्गीयांच्या तीन गटात आपआपसात अदलाबदल करून पदे भरण्याबाबतचे सुधारित आदेश.

---

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: बीसीसी-१०९४/२५५१(७)/१६-ब,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक ७ मार्च, १९९४

पहा:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७० [सीआर]-जे, दिनांक २८ मे, १९७१

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७२/सीआर-जे, दिनांक २३ मे, १९७२

३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७२/सीआर-जे, दिनांक २७ जून, १९७४

४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७०-१६, दिनांक १९ डिसेंबर, १९७९

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०७८/४२४/१२४/१६-ब, दिनांक २७ फेब्रुवारी, १९८०.

६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७७/८३१/१६-ब, दिनांक १४ एप्रिल, १९८१,

७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०८२/१७७७/१६-ब, दिनांक ६ जानेवारी, १९८३.

८) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८३/१६-ब, दिनांक २९ जानेवारी, १९८३.

९) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१९८९/प्र.क्र.२२०/८९/१६-ब, दिनांक १२-७-१९८९

१०) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक बीसीसी-१०८९/प्र.क्र.२२९/८९/१६-ब, दिनांक ११-८-१९८९

११) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०८९/प्र.क्र.३३८/८९/१६-ब, दिनांक ३०-९-१९८९

## शासन निर्णय

उपरोक्त शासकीय परिपत्रके व निर्णयाद्वारे मागासवर्गीयांसाठी सरळभरती व पदोन्नतीमध्ये पदे राखून ठेवावी. योग्य उमेदवार भरती

मा.प.

[illegible] उपलब्ध झाला नाही तर त्याचे तदनंतरचे आरक्षण ५ भरतींचे पश्चात्तरचे आरक्षण ३ भरतीपर्यंत पुढे नेणे ( Carry Forward ) व त्यानंतर सदर आरक्षण व्यपगत करणे( Lapse ) मागासवर्गीय तीन गटांची ( अनु·जाती· अनु·जमाती, विजा/भज) पुढे नेण्यात आलेली पदे (अनुशेष) व चालू आरक्षणांची संख्या व इतर मागासवर्गीयांचे १०% आरक्षण मिळून एका भरती पुरती आरक्षणासंबंधीची ५०% मर्यादा, आरक्षित पदे आपआपसात अदलाबदल करून भरणे इत्यादीसंबंधी वेळोवेळी आदेश देण्यात आलेले होते· पर त्या आदेशात सुधारणा करून शासन आता पुढीलप्रमाणे आदेश देत आहे:-

२· <u>एका भरतीपुरती मागासवर्गीयांच्या आरक्षित पदांची ५०% ची मर्यादा अनुशेष भरतीच्या संदर्भात शिथिल करून अनुशेष १००% भरण्याबाबत·</u>

दिनांक २७ जून,१९७७ च्या आदेशाप्रमाणे मागासवर्गीयांच्या ३ गटातील म्हणजेच अनु·जाती· अनु·जमाती व विजा/भज यांच्या करिता एका भरती पुरती आरक्षित पदांची मर्यादा ५०% पेक्षा जास्त होऊ नये असे आदेश दिले होते· वेळोवेळी मुदतवाढ देऊन केवळ हे आदेश दिनांक २६ जानेवारी, १९९० पर्यंत चालू ठेवण्यात आले होते· या ५०% च्या मर्यादेत - (१) अनुशेषाची पदे (२) गुणवत्तेवर निवड झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांची पदे (३) चालू आरक्षणाची पदे यांचा समावेश होतो· राज्य शासनाने सेवेतील भरतीसाठी इतर मागासवर्गीयांसाठी १०% आरक्षण ठेवले आहे· हे १०% (इमाव) व अन्य तीन मागासवर्गीय गटांचे ४०% आरक्षण अशी एकूण ५०% ची आरक्षित ठेवण्याची मर्यादा होती· परंतु आता केंद्र शासनाने सूचित केल्याप्रमाणे अनुशेषाची केवळ रिक्त पदे कोणतीही मर्यादा न लावता १००% भरता येतील· म्हणजेच, सुधारित धोरणानुसार मागासवर्गीयांच्या तीन गटांची (अनु·जाती· अनु·जमाती, वि·जा·/भ·ज·) अनुशेष म्हणून पुढे नेण्यात आलेली आरक्षित पदे (जागा) ( Vacancy ) भरतांना ती संपूर्ण सर्व १००% भरता येतील व भरतीसाठी ५०% ची जी सर्वसाधारण मर्यादा आहे ती अशा अनुशेषाच्या रिक्त ठेवलेल्या पदांना लागू होणार नाही· ही अनुशेषाची रिक्त पदे भरतांना त्यासाठी पुन्हा बिंदुनामावलीचा वापर करण्यात येऊ नये· (कारण हे नवे/ चालू आरक्षण नाही)· थोडक्यात पूर्वीची न भरलेली रिक्त असलेली अनुशेषाची पदे संपूर्ण सर्व १००% भरता येतील· नवी पदे भरतांना आरक्षण

यात्रू आरक्षण भोजण्यात यावे. यात्रू आरक्षणात ५०% भरतीची मर्यादा लागू राहील. उदा. मागील अनुशेष १० असा आहे [ ३ पदे अनु.जाती, ५ पदे अनु.जमाती व २ पदे वि.जा./भ.ज.]. आता १६ जागा भरण्यासाठी कार्यवाही करावयाची आहे. अनुशेषाची संख्या सर्व

१० पदे १००% भरता येतील व त्या १० पदांसाठी पुन: बिंदुनामावलीचा वापर करता येणार नाही. हा अनुशेष वजा जाता ज्या ६ जागा शिल्लक राहतील त्यासाठीच फक्त बिंदु नामावलीचा वापर करावा व मागासवर्गीयांचे यात्रू आरक्षण भोजण्यात यावे. ही पदे खालीलप्रमाणे जाहीर करण्यात यावीत:-

| | एकूण | खुला प्रवर्ग | अनु. जाती | अनु. जमाती | वि.जा. भ.ज. | इतर मागासवर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| मागील अनुशेष | १० | - | ३ | ५ | २ | [ ओबीसी] अनुशेष पुढे नेता येत नाही. |
| नवी पदे[जागा] -यात्रू आरक्षण (बिंदुनामावली नुसार]. | ६ | ३ | १ | १ | - | १ |
| एकूण | १६ | ३ | ४ | ६ | २ | १ |

टीप: जर संपूर्ण १००% अनुशेष भरण्यासाठी पुरेशी पदे उपलब्ध नसतील तर सर्वात जुना अनुशेष प्रथम भरण्यात यावा व शिल्लक अनुशेष भरतीसाठी पुढे नेण्यात यावा.

३. <u>मागासवर्गीयांची आरक्षित पदे पूर्व मंजुरीने तात्पुरती बिगर आरक्षित करून खुल्या प्रवर्गाने भरण्याची सुधारीत पध्दत:-</u>

राज्य शासनाच्या दिनांक २७ जून,१९७४ च्या आदेशाप्रमाणे आरक्षित पदांसाठी त्या त्या गटातील मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध न झाल्यास पदे रिक्त ठेवण्याची तरतूद होती. म्हणजेच, पदे बिगर आरक्षित करण्याची तरतूद नव्हती. मात्र प्रत्यक्षात असे आढळून दिसून आले आहे की, ब-याच नियुक्ती अधिका-यांनी आजपावेतो आरक्षित पदे पूर्व मंजुरी घेऊन/ पूर्व मंजुरी न घेता त्यावर खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची नियुक्ती केली आहे अथवा आरक्षित पदे रिक्त ठेवण्याची फार क्वचितच अंमलबजावणी झाली आहे. अलिकडेच केंद्र शासनाने मागासवर्गीयांची आरक्षित पदे बिगर आरक्षित करून भरण्याबाबत [ वर्ग-१ ची काही पदे वगळता] सर्व

बंधन घातले आहे. केंद्र शासनाच्या वरील आदेशाच्या संदर्भात विचार करता असे दिसून आले आहे की, राज्यातील परिस्थिती केंद्र शासनासारखी नाही. राज्य शासनाची पदे आणि संवर्ग दूरवर ग्रामीण भागात विखुरलेले आहेत आणि विशिष्ट गटातील मागासवर्गीय उमेदवार न मिळाल्यास (विशेषतः काही तांत्रिक पदांच्या एकाकी पदांसाठी) लोकहिताच्या व प्रशासकीय दृष्टीने ही आरक्षित पदे दीर्घकाळ रिकामी ठेवणे योग्य होणार नाही. म्हणून आरक्षित पदे विनाआरक्षित करण्यास सरसकट बंदी घालून ही पदे कामाची निकड पाहता रिक्त ठेवण्यात अडचणी आहेत. मात्र याबाबत अपवादात्मक परिस्थितीत खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात यावी:-

(अ) वर्ग-१ व २ ची आरक्षित पदे विनाआरक्षित करावयाची झाल्यास, त्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे आदेशासाठी, म्हणजेच मुख्य मंत्र्यांच्या आदेशासाठी प्रशासकीय विभागाने त्यांचे संबंधित राज्यमंत्री, मंत्री (समाज कल्याण) (अनु.जाती आणि अनु.जमातींच्या आरक्षणाबाबत) किंवा मंत्री आदिवासी विकास (अनु.जमातींच्या आरक्षणाबाबत) यांचे मार्फत सादर करण्यात यावा. मात्र असा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी आरक्षित पदांची दुसऱ्यांदा जाहीरात देऊन [ महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणी करून ] भरतीसाठी प्रयत्न केलेला असावा व पहिल्या जाहिरातीपासून किमान १ वर्षाचा कालावधी झालेला असावा. त्याप्रमाणे २ वेळा जाहिरात देऊनही मागासवर्गीयांच्या विशिष्ट गटातील उमेदवार उपलब्ध होऊ शकला/शकले नाहीत तर ते पद/पदे विनाआरक्षित करून भरणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे. असे प्रमाणपत्र विभागाच्या सचिवांनी प्रस्तावात नमूद केलेले असावे.

(आ) वर्ग-३ व ४ मधील फक्त तांत्रिक पदांच्या संदर्भात आणि अगदी अपवादात्मक परिस्थितीत जर दुसऱ्यांदा जाहिरात देऊन किंवा निवड मंडळाकडे मागणी करून सुध्दा मागासवर्गीय उमेदवार उपलब्ध झाले/झाला असेल नसेल व पहिल्या जाहिरातीपासून किमान २ वर्षाचा कालावधी झालेला असेल त्याप्रमाणे पद/पदे विनाआरक्षित करून भरणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी प्रमाणित केले तरच आरक्षित पद/पदे विनाआरक्षित करण्याचा प्रस्ताव सादर करता येईल. असा प्रस्ताव प्रशासकीय विभागाचे राज्यमंत्री, मंत्री, यांचे मार्फत मंत्री, समाजकल्याण ... आदेशासाठी सादर करणे बंधन-

वरील उपपरिच्छेद ( अ) व (आ) प्रमाणे केवळ अपवाद म्हणून तात्पुरत्या स्वरूपात बिगर आरक्षित केलेली पदे वगळता, आरक्षित पदे तात्पुरती किंवा कायम स्वरूपी भरता येणार नाहीत. ती तशीच रिक्त ठेवावी लागतील. शासनाची पूर्व मंजुरी न घेता आरक्षित पदे विनाराखीव करता येणार नाहीत किंवा ती परस्पर दुसऱ्या गटाच्या उमेदवारांमधून भरताही येणार नाहीत. ती तशी भरण्यात आली तर संबंधित नियुक्ती अधिकाऱ्यास त्याबाबत जबाबदार धरण्यात येईल व त्याचे विरुद्ध प्रचलित नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल.

४. अनु.जाती. अनु.जमाती. वि.जा./भ.जमाती या मागासवर्गीयांच्या आरक्षित पदांची अदलाबदल करून ती त्याच गटातील उमेदवारांनी भरण्याची सुधारित कार्यपध्दती.

शासन निर्णय, क्रमांक बीसीसी-१०७८/८२४/१२४/१६-ब दिनांक २५ फेब्रुवारी, १९८० व सम क्रमांकाचे दिनांक २३ जानेवारी, १९८१ च्या आदेशानुसार पदोन्नतीसाठी पद नमूद केलेल्या आरक्षित गटापैकी विशिष्ट गटाचे अ कर्मचारी उपलब्ध नसतील तर त्यांची आरक्षित पदे मागासवर्गीयांच्या इतर कोणत्या गटातील कर्मचाऱ्यांनी परंतु त्या त्या गटाच्या आरक्षणाच्या मर्यादेपर्यंतच म्हणजेच मागील अनुशेष आणि चालू अ आरक्षण मिळून त्या गटाच्या एकूण पदांच्या मर्यादे पर्यंतच ( up to their quota ) भरण्याची तरतूद आहे. तसे करूनही आरक्षित जागा भरता आल्या नाहीत तर त्या पदोन्नतीच्या जागा तीन भरती वर्षे पुढे नेण्यात याव्यात व कोणत्याही परिस्थितीत पूर्व मंजुरी घेतल्याशिवाय त्या आरक्षित जागा खुल्या प्रवर्गाने न भरता तीन भरती वर्षे रिक्त ठेवण्यात याव्यात असे आदेश आहेत. त्याच प्रमाणे शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक बीसीसी-१०७८/सीआर-५, दिनांक २८ मे, १९८१ मध्ये असे आदेश आहेत की, योग्य मागासवर्गीय उमेदवारांच्या अभावी आरक्षित पदे सरळभरतीने भरता आली नाहीत तर आरक्षित पदे [ जागा ] ५ भरती वर्षे रिक्त ठेवाव्यात व आरक्षण पुढे नेण्यात यावे.

उपरोक्त आदेशात सुधारणा करून शासन असे आदेश देते की, येथून पुढे मागासवर्गीयांची पदोन्नती व सरळभरतीमधील आरक्षित पदे योग्य उमेदवार न मिळाल्याच्या कारणास्तव (तीन/पाच भरती वर्षा नंतर )

व्यपगत(अनुशेष) न करता ते पद भरावे व रिक्त ठेवण्यात आलेली अशी आरक्षित पदे ज्या मागासवर्गीय गटाची आरक्षित पदे आहेत त्या त्याच गटाच्या उमेदवारांनी भरण्यासाठी तीन वेळा [ तीन भरती वर्षे] प्रयत्न करावेत. त्यानंतर मात्र त्या विशिष्ट गटाचा उमेदवार उपलब्ध झाले/झाला नाही तर आरक्षण व्यपगत न होता रिक्त पदे/पद मागासवर्गीयांच्या इतर दोन गटाच्या [ उदा. अनु.जाती/ जमाती व अनु.जमाती [किंवा वि.जा./भ.ज.च्या] उमेदवाराने भरण्यात यावे/ यावीत. अशा तऱ्हेने आरक्षित पदे मागासवर्गीयांच्या इतर गटातील उमेदवारांनी अदलाबदल करून भरण्यात कोणतीही कालमर्यादा रहाणार नाही. तसेच त्या त्या गटाच्या विशिष्ट आरक्षणाची [ Quota ] जी मर्यादा आहे तिचे बंधन असणार नाही. अशी अदलाबदल करून पदे भरतांना इतर मागासवर्ग [ O.B.C. ] या गटाच्या उमेदवारांनी भरणे अनुज्ञेय नाही.

५. उपरोक्त आदेश हे सध्या चालू असलेल्या सरळसेवा भरतीमधील [शासन निर्णय, दिनांक १२ जुलै,१९८९] तसेच पदोन्नतीमधील [शासन निर्णय, दिनांक ३० सप्टेंबर,१९८९] अनुशेष भरून काढण्याच्या विशेष भरती मोहिमे संदर्भात लागू असणार नाहीत. म्हणजेच अशा अनुशेषाची मोजणी होऊन पदे भरण्याची कार्यवाही करण्यात आली आहे/येत आहे. त्या अनुशेष भरतीसाठी हे आदेश लागू असणार नाहीत. सरळभरतीचा अनुशेष भरून काढण्यासाठी दिनांक ३१ डिसेंबर,१९९१ पर्यन्त मुदतवाढ देण्यात आलेली आहे. दिनांक ३० जून, १९८९ अखेरचा राहिलेला अनुशेष दिनांक ३१-१२-१९९१ पर्यन्त जर भरून काढला आला नाही तर तो वरील सुधारीत आदेशानुसार व्यपगत ठरणार नाही आणि तो अनुशेष उपरोक्त परिच्छेद ४ मधील तरतुदीप्रमाणे भरून काढावा.

६. वरील आदेश शासकीय/निमशासकीय सेवा, तसेच महामंडळे,मंडळे महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, अनुदानित संस्था, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम, विद्यापीठे,अनुदानित शैक्षणिक संस्था, इ. आस्थापनेमधील पदांना लागू राहतील. मंत्रालयीन विभागांनी आवश्यक असेल तेथे त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील निम-शासकीय संस्था/कार्यालयातील पदांबाबत विहित नियम/अधिनियमाखाली सूचना निर्गमित कराव्यात अशी त्यांना विनंती आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/- पु.द.भालेराव